राज्यामध्ये मुलींसाठी नवीन शासकीय
औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करणे.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग,
शासन निर्णय क्रमांक: टिप्रसए-५०९०/[७९५]/व्यशि-४,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २५ जुलै १९९१.

वाचा :- १] संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अ.शा.पत्र क्र.१५/डाय/एसडब्ल्यूपी/१९९१[४]/८८, दि. १७ जुलै १९९१.

शासन निर्णय :- केंद्र शासनाच्या रोजगार महासंचालनालयाने जागतिक बँकेच्या सहाय्याने हाती घेतलेल्या व्यवसाय प्रशिक्षण प्रकल्पामध्ये मुलींच्या प्रशिक्षणास चालना देण्यासाठी मुलींसाठी नवीन औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्याच्या कार्यक्रमाचा समावेश आहे. या कार्यक्रमांतर्गत राज्यामध्ये मुलींसाठी ठाणे, पुणे, लातूर, चंद्रपूर, जळगांव, अकोला, भंडारा, रत्नागिरी व बीड या ९ ठिकाणी प्रत्येकी ९६ प्रशिक्षणार्थींच्या सोबतच्या प्रपत्र "अ" मध्ये दर्शविलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमासह शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्यास शासन या आदेशान्वये मंजूरी देत आहे. त्याचप्रमाणे सोबतच्या प्रपत्र "ब" मध्ये दर्शविल्याप्रमाणे या प्रत्येक संस्थेसाठी निरनिराळ्या संवर्गात एकूण १७ पदे नव्याने निर्माण करण्यास व ती आवश्यकतेनुसार भरण्यासही शासन या आदेशान्वये मान्यता देत आहे. यासाठी होणारा खर्च राज्य शासन व केंद्र शासनाने ५०:५० या प्रमाणात करावयाचा आहे.

२. या ९ संस्थांपैकी ठाणे, पुणे, लातूर, चंद्रपूर, जळगांव व अकोला या ६ औद्योगिक प्रशिक्षण संस्था ऑगस्ट, १९९१ च्या सत्रापासून सुरु करण्यास शासन मान्यता देत आहे. उर्वरित भंडारा, रत्नागिरी व बीड येथे सुरु करावयाच्या ३ संस्था त्या त्या जिल्हा नियोजन व विकास मंडळांनी त्यासाठी तरतूद उपलब्ध करुन दिल्यानंतरच सुरु करण्यात याव्यात. या संस्थांसाठी निर्माण करावयाची पदे सुरुवातीला २८.२.९२ पर्यंत चालू ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे. ती पुढे चालू ठेवण्यासाठी संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी प्रस्ताव सादर करावा. ही पदे त्या त्या संवर्गामध्ये तात्पुरती वाढ समजण्यात यावी. त्या त्या पदावरील पदधारक नियमानुसार वेतन, भत्ते इ. घेण्यास पात्र असतील. संबंधित संस्थेचे प्राचार्य त्या त्या संस्थेचे कार्यालय प्रमुख तसेच आहरण व संवितरण अधिकारी म्हणून निर्देशित करण्यात येत.

३. उपरोक्त ६ संस्थांसाठी निर्माण करावयाच्या पदांचे वेतन, भत्ते, कच्चा माल, इतर आवर्ती खर्च तसेच या संस्थांमध्ये सुरु करावयाच्या व्यवसाय अभ्यासक्रमांसाठी आवश्यक यंत्रसामुग्री, साहित्य साधने व फर्निचर यासाठी येणारा अनावर्ती खर्च मिळून एकूण रु. ७१,०४,०००/- इतक्या खर्चासही शासन या आदेशान्वये मंजूरी देत आहे. हा खर्च "२२३०, कामगार व सेवायोजन - ०३ प्रशिक्षण - पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-००३ [दोन][सी] शिल्प कारागीरांच्या तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षणाचा विस्तार मागणी क्र.ई-७" या अर्थ शीर्षाखाली दर्शविण्यात यावा व त्यासाठी पुरवणी

..२/-

भागभांडवलाद्वारे केलेल्या तरतुदीतून भागभांडवलात वाटा. अतिरिक्त भंडारा, रत्नागिरी व बीड येथील संस्थांसाठी सोडतीत जिल्हा नियोजन व विकास मंडळाने वार्षिक योजनेतून निधी उपलब्ध केल्यानंतर संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी तरतूद करण्यासाठी प्रस्ताव सादर करावा.

४. हा शासन निर्णय, नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने आणि वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक:प्रा-६५८/९२/व्यय-५, दिनांक १० एप्रील १९९२ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

सही/-
[ हु. न. पानसरे ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/ /पुणे
नाशिक/नागपूर/औरंगाबाद/अमरावती.
प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, ठाणे/पुणे/धडगांव/लातूर/चंद्रपूर/अकोला/भंडारा/
रत्नागिरी/बीड [द्वारा संचालक, व्य. शि. व प्र. म. रा., मुंबई]
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर/ १ व २ [लेखा व अनुज्ञेयता],
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर/ १ व २ [लेखा परीक्षा],
निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे/पुणे/धडगांव/लातूर/चंद्रपूर/अकोला/भंडारा/
रत्नागिरी/बीड.
जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन व विकास मंडळ, ठाणे/पुणे/
धडगांव/लातूर/चंद्रपूर/अकोला/भंडारा/रत्नागिरी/बीड,
वित्त विभाग [व्यय-५],
नियोजन विभाग,
उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग/अर्थसं-२/व्यशि-१/व्यशि-२,
निवड नस्ती, व्यशि-४.

पीडीएल/२८.७.९२.

Generated by CamScanner